दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७९ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.३१ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पहिली यादी जाहीर


## सुप्रिया सुळे,अमोल कोल्हे,नीलेश लंकेंना उमेदवारी;जयंत पाटील यांची घोषणा

मुंबई (वृत्तसंस्था)-शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघातून अमर काळे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. तर दिंडोरी मधून भास्करराव भगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सुप्रिया सुळे यांना पुन्हा एकदा बारामती लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. तर अपेक्षेप्रमाणे शिरुर लोकसभा मतदारसंघातून डॉ. अमोल कोल्हे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. कालच लोकसभा निवडणूक लढवण्याची घोषणा करणारे नीलेश लंके यांना अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार







बारामती लोकसभा मतदारसंघातून शरदचंद्र पवार गटाने पुन्हा एकदा सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर महायुतीच्या वतीने अद्याप या मतदारसंघातून उमेदवार जाहीर झालेला नाही. मात्र, तरी देखील अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघात पवार विरुद्ध पवार अशी लढत होणार असल्याची चर्चा सध्या रंगली आहे. आता सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर झाली असून सुनेत्रा पवार यांची उमेदवारी देखील जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अपेक्षेप्रमाणे अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून नीलेश लंके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. नीलेश लंके यांनी कालच आमदारकीचा राजीनामा देत आपण लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे ते शरद पवार गटाचे उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. आज त्यांना उमेदवारी जाहीर झाली असून अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील भाजपचे विद्यमान खासदार सुजय विखे पाटील यांच्यासमोर दिनेश लंके यांचे तगडे आव्हान असणार आहे.शिरूर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना पुन्हा एकदा शरदचंद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली आहे. अमोल कोल्हे यांच्या विरोधात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार आढळराव पाटील हे असणार आहेत. या दोन्ही नेत्यांनी या आधी शिरूर लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. त्यामुळे ही लढत देखील काट्याची टक्कर होणार असल्याची चर्चा सध्या दिसून येत आहे.

# गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघात १० उमेदवारांमध्ये लढत

## दोन उमेदवारांची माघार



**गडचिरोली । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत १२- गडचिरोली-चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या आजच्या अंतिम दिवशी मिलींद नरोटे व हरिदास बारेकर या दोन उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे लोकसभा मतदारसंघाकरिता आता दहा उमेदवारांमध्ये निवडणूकीची लढत होणार आहे. दरम्यान सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप देखील आज करण्यात आले आहे. याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रपरिषदेत जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने यांनी माहिती दिली.

हे उमेदवार आहेत रिंगणात : नामनिर्देश अर्ज मागे घेतल्यानंतर आता १२- गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नाव, पक्ष व चिन्ह पुढीलप्रमाणे आहे.

राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्षाचे उमेदवार : अशोक महादेवराव नेते, भारतीय जनता पार्टी (कमळ), डॉ. नामदेव दसाराम किरसान, इंडियन नॅशनल काँग्रेस (हात), योगेश नामदेवराव गोन्नाडे, बहुजन समाज पार्टी (हत्ती). नोंदणीकृत राजकीय पक्षांचे उमेदवार : धीरज पुरूषोत्तम शेडमागे, जनसेवा गोंडवाना पार्टी (करवत), बारीकराव धर्माजी मडावी, बहुजन रिपब्लीकन सोशालिस्ट पार्टी (शिट्टी), सुहास उमेश कुमरे,भीमसेना (ऑटोरिक्षा), हितेश पांडूरंग मडावी, वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर). इतर उमेदवार : करण सुरेश सयाम, अपक्ष (ऊस शेतकरी), विलास शामराव कोडापे, अपक्ष(दूरदर्शन), विनोद गुरुदास मडावी, अपक्ष ( अंगठी)


# १३ चंद्रपूर लोकसभा मतदार संघात १५ उमेदवारांमध्ये लढत

## जिल्हाधिकाऱ्यांची पत्रकार परिषदेत माहिती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत १३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात २० मार्च ते २७ मार्च या कालावधीत इच्छूक उमेदवारांकडून एकूण ४८ नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आलीत . सादर नामनिर्देशनपत्रांची २८ मार्च रोजी छाननीची प्रक्रिया पार पडल्यानंतर छाननीअंती एकूण ३३ नामनिर्देशनपत्र अपात्र करण्यात येऊन १५ नामनिर्देशनपत्र पात्र करण्यात आले सदर पात्र उमेदवारांना ३० मार्च रोजी दुपारी ३ वाजेपावेतो त्यांची उमेदवारी मागे घेणे करीत वेळ देण्यात आली होती . यात एकही उमेदवाराने अर्ज मागे न घेतल्याने लोकसभा मतदारसंघाकरिता आता १५ उमेदवारांमध्ये निवडणूकीची लढत होणार आहे. दरम्यान सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप देखील ३० मार्च रोज शनिवारला करण्यात आले आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन भवन येथे झालेल्या पत्रपरिषदेत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी हि माहिती दिली.

लोकसभा निवडणुकीकरिता एकूण २११८ मतदान केंद्रावर १८ लाख ३७ हजार ९०६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात ९ लाख ४५ हजार ७३६ पुरुष मतदार असून ८ लाख ९२ हजार १२२ महिला मतदार तर ४८ इतर मतदारांचा समावेश आहे . महत्वाचे म्हणजे यात १८ ते १९ वयोगटातील २४ हजार ४४३ नवमतदार पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार आहेत



ज्यात १३ हजार ८७८ पुरुष तर १० हजार ५६४ महिला मतदारांचा समावेश आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी पत्रकार परिषदेत दिली या पत्रकार परिषदेला जिल्हाधिकारी विनय गौडा , मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी उपस्थित होते.

हे उमेदवार आहेत रिंगणात : १३ चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नाव, पक्ष पुढीलप्रमाणे आहे.

धानोरकर प्रतिभा सुरेश उर्फ बाळूभाऊ - इंडियन नॅशनल काँग्रेस , मुनगंटीवार सुधीर सच्चिदानंद - भारतीय जनता पार्टी , राजेंद्र हरिश्चंद्र रामटेके - बहुजन समाज पक्ष , अवचित शामराव सयाम - जनसेवा गोंडवाना पार्टी , अशोक राणाजी राठोड - जय विदर्भ पार्टी , नामदेव माणिकराव शेडमाके - गोंडवाना गणतंत्र पार्टी , पूर्णिमा दिलीप घोनमोडे - बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी , बेले राजेश वारलुजी - बहुजन वंचित आघाडी , वनिता जितेंद्र राऊत - अखिल भारतीय मानवता पक्ष , विकास उत्तमराव लसंते- सन्मान राजकीय पक्ष , विद्यासागर कालिदास कासर्लावार - भीम सेना , सेवकदास कवडूजी बरके - पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक ) तर इतर व अपक्ष असे तीन उमेदवार उभे आहेत अनुक्रमे दिवाकर हरिजी उराडे -अपक्ष , मिलिंद प्रल्हाद दहिवले - अपक्ष , संजय नीलकंठ गावंडे - अपक्ष

# काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश देवतळेंचा भाजपात प्रवेश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पूर्व विदर्भात काँग्रेसला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश देवतळे यांनी शुक्रवार(२९मार्च)ला काँग्रेसच्या सदस्यत्वाचा पक्षाध्यक्ष नाना पटोले यांचेकडे राजीनामा दिला आहे. काँग्रेसमध्ये हुकुमशाही, परिवारवाद आणि दिशाहिन प्रदेश नेतृत्त्व असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. देवतळे यांनी काँग्रेसला रामराम करीत भाजपात प्रवेश केला आहे.

प्रकाश देवतळे म्हणाले, बहुसंख्य असलेल्या तेली समाजाला काँग्रेसने विदर्भात एकही उमेदवारी दिलेली नाही. तेली समाज काँग्रेसच्या पाठिशी राहिला आहे. पण त्याची प्रदेश अध्यक्षांनी दखल घेतली नाही. त्यामुळे नाराजीतून आपण राजीनामा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देवतळे यांनी ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात व आ बंटी भांगडिया यांच्या उपस्थितीत भाजपात नागपूर येथे प्रवेश केला.

## मुंबईतील मिठागरावर भाजपाचा डोळा

# भाजपाचं धोरण 'गरिबी हटाओ' नसून 'गरीबको हटाव'-आदित्य ठाकरे

**मुंबई**-शिवसेना नेते, युवासेना प्रमुख श्री. आदित्य ठाकरे यांची मातोश्री येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती . यावेळी मुंबई उत्तर चे लोकसभा उमेदवार, भाजपचे श्री पीयूष गोयल यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत 'झोपडपट्ट्या शहरातून काढल्या गेल्या पाहिजेत आणि त्या सर्व मिठागरांच्या जमिनीवर हलवल्या जायला हव्यात', असं वक्तव्य केलं होतं. या वक्तव्याचा आदित्य ठाकरेंनी समाचार घेतला.

यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की 'गेली १० वर्षं केंद्रात भाजपचं संपूर्ण बहुमत असलेलं हुकूमशाही सरकार आहे , आणि ८.५ वर्षं (२.५ घटनाबाह्य सरकार धरुन तुमच्या पक्षाने राज्यावर राज्य केलं आहे. काल तुम्ही मुलाखतीत नमूद केलेल्या गोष्टींचा विकास करण्याच्या भरपूर संधी तुमच्या पक्षाला मिळाल्या होत्या... परंतु केंद्र सरकारकडून मुंबईकरांना काय मिळाल ? मुंबईकरांची केवळ फसवणूक, आर्थिक लूट आणि अभिमानाला ठेच पोहचवण्याच काम तुम्ही केलंत' असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला.भाजपच्या धोरणावर बोट ठेवताना आदित्य ठाकरे म्हणाले की 'पियुष गोयल यांनी अचानक मुंबई उत्तर ची



जागा लढवण्याचा निर्णय घेतला, ह्याचा अर्थ असा नाही की तुम्ही आमच्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांवर हुकूमशाही राजवट लागू कराल आणि त्यांना बळजबरीने खारफुटीच्या जमिनीवर नेऊन सोडाल . त्यांनाही शाश्वत विकास हवा आहे, ज्याला आम्हा सर्व मुंबईकरांचा पाठिंबा आहे. भारताच्या विकासात त्यांचाही मोठा हात आहे. २०२२ पर्यंत प्रत्येक नागरीकाला स्वतःचे घर असण्याचे तुमच्या पक्षाचे आश्वासन अजूनही पूर्ण झालेलं नाही. कदाचित तुम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी लिहिलेली घटना ह्याचसाठी बदलायची आहे - 'मित्रांचा विकास आणि गरीब हटाओ!' हे धोरण राबवायच आहे . मात्र शाश्वत विकासासाठी आम्हीही कटिबद्ध आहोत. पण बिल्डर्सना फायदा व्हावा ह्यासाठी भाजपचा मुंबईतील मिठागरांच्या जमिनींवर डोळा आहे . आम्ही आमच्या मिठागरांच्या जमिनींचं बिल्डर लॉबीपासून संरक्षण करू . आणि स्पष्टं दिसतंय, सध्याच्या राजवटीचा हेतू 'गरीबी हटाओ' नसून 'गरीब को हटाओ' असा आहे. असं आदित्य ठाकरे म्हणाले .भाजपच्या धोरणावर बोट ठेवताना आदित्य ठाकरे यांनी सरकारला सवाल कवला आहे . मेट्रो कार डेपो ३,४,६ आणि १४ च्या कांजूरमार्ग जमिनीचा प्रस्ताव केंद्र सरकारने सॉल्टपॅन असल्याचा खोटा दावा करून का रोखला होता ? फक्त मुंबईकरांना फायदा होईल म्हणून ? कारशेड कांजूरमार्ग ला मागायचो तेव्हा हेच उमेदवार मंत्री असताना त्यांच्या खात्याने विरोध केला . सरकार पडल्यावर आरे येथे कारशेड आणला आणि मुंबईच्या विकासात खडा टाकण्याचा काम केलं, असं आदित्य ठाकरे म्हणाले. तसंच गोयल हे रेल्वेमंत्री असताना ट्रेन बंद करू नका, अस उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी विनंती केली होती. तरी ट्रेन बंद केली .त्यामुळे मोठया प्रमाणात मजदूरांचे हाल झाले होते. यांची देखील आठवण आदित्य ठाकरेंनी करून दिली.

# शेतकऱ्यांसाठी कर्ज भरण्याबाबत दिनेश चोखारे यांचे आवाहन

## शेतकऱ्यांच्या कर्जाचे हप्ते रोख रक्कम स्विकारावी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने शेतकऱ्यांसाठी कर्ज भरण्यासाठी बँका आज(रविवार) खुल्या असतील. मात्र, शेतकऱ्यांना रोख रक्कम स्वीकारण्यास नकार दिला जात आहे आणि चेक किंवा आरटीजीएस द्वारे कर्ज भरण्यास सांगितले जात आहे.



या संदर्भात काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनेश दादा पाटील चोखारे यांनी प्रसिद्धी पत्रक जारी केले आहे. शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी रोख रक्कम स्वीकारण्यास नकार देऊ नये. शेतकऱ्यांना सहकार्य करून त्यांना कर्ज भरण्यास मदत करावी.या प्रकरणी शेतकऱ्यांना त्रास होत असल्यामुळे बँकांनी त्वरित लक्ष देऊन त्यांना मदत करणे गरजेचे आहे, असेही चोखारे म्हणाले.


# युगप्रवर्तक संत एकनाथ महाराज!

**संत एकनाथ महाराजांनी ज्या दिवशी समाधी घेतली तो फाल्गुन वद्य षष्ठी हा दिवस नाथषष्ठी म्हणून ओळखला जातो. या दिवशी पैठण या गावी समाधी उत्सव होतो. त्यावेळी भरणाऱ्या यात्रेला लाखोंचा जनसमुदाय नाथांच्या समाधीच्या दर्शनाला येतो. अधिक माहितीसाठी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख वाचा.... संपादक.**

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज महाराष्ट्रातील महत्त्वाचे संत होत. त्यांचे जन्मस्थान गोदावरी काठावरील औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण होय. संत एकनाथ महाराज स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस आणि पुण्यतिथी षष्ठीलाच साजरी करत. पारंपरिक मराठी पंचांग, दिनदर्शिकेप्रमाणे फाल्गुन महिन्यातील वद्य पक्षातील षष्ठीच्या दिवशी श्री एकनाथ षष्ठी साजरी केली जाते. या दिवशी श्री एकनाथ महाराजांनी जलसमाधी घेतली, असे मानले जाते. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीची पहिली अस्सल शुद्ध आवृत्ती लोकांपुढे आणण्याचे श्रेय संत एकनाथ महाराजांना दिले जाते. एकनाथी भागवतातील १८ हजार ८०० ओव्यांच्या माध्यमातून श्रीमद् भागवत पुराणाच्या स्कंदावर त्यांनी भाष्य केले. संत एकनाथ महाराजांनी सामान्यांना भक्तीचा मार्ग ज्ञानाच्या मार्गापेक्षा सोपा आहे, मोक्षासाठी तो पुरेसा असल्याचे सांगितलेले आहे.

श्री एकनाथ महाराजांच्या घराण्याचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. संत एकनाथ महाराजांना नाथही संबोधतात. नाथांचे पणजोबा श्री संत भानुदास महाराजांनी कर्नाटकात श्रीकृष्णदेवरायाने नेलेली श्री विठ्ठरायाची मूर्ती पंढरीत परत आणली, हा इतिहास आहे. पुढे त्यांनी पंढरपुरात सोळखांबी येथे समाधी घेतली. सोळखांबीतून पांडुरंगाच्या गाभाऱ्यात जाताना उजव्या हाताची पहिली संत भानुदास महाराजांची समाधी आहे. ज्या ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचा पाया म्हटला जातो, त्या ज्ञानेश्वरांची समाधी २५० वर्षानंतर लोकांच्या विस्मरणात गेली. परंतु नाथांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा शोध लावला. समाधीचा चौथरा आणि गाभारा नाथांनी बांधला. आळंदीची वारी पुन्हा सुरु केली. ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथांची लेखणी लोकोद्धारासाठीच झिजली, तळमळली, तळपली होती, असे श्री. एकनाथपदाश्रित योगिराज महाराज गोसावी- पैठणकर आपल्या एका लेखात नमूद करतात.

संत एकनाथ महाराज युगप्रवर्तक होते. त्यांनी भारुड, अभंगाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मुलन, जातीयतेच्या विरोधात कार्य केले. कृतीतून दाखवूनही दिले. डोळस कृतीशील समाज निर्मितीसाठी प्रयत्न केले. संत कवींनी संपन्न केलेल्या भारुड रचनेच्या शैलीला संत एकनाथ महाराजांनी भाषा समृद्धी दिली. अमृताहूनी गोड अशा मराठी भाषेला लोकभाषा बनविली. त्याचबरोबर हिंदी भाषेतही त्यांनी रचना केल्या. भागवत धर्मप्रसाराच्या हेतूने त्यांनी हिंदी भाषेचा कौशल्यपूर्णरित्या वापर करुन भारुडातून रुढी परंपरांवर प्रहार केले आहेत. दोनशेपक्षा जास्त पदे त्यांनी हिंदीतून लिहिली आहेत. संत एकनाथ महाराजांचे अनेक पैलू आहेत.




**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

समकालिनांना ते आदर्श आहेत, तसेच आधुनिकांनाही. संत एकनाथांनी ब्रम्हविद्येचा सुकाळ होता त्यावेळी सामान्यांच्या कल्याणासाठी ग्रंथसंपदा निर्मित केली. इतर संतांपेक्षाही ती अधिक अशीच आहे. त्यात विविधता आहे. यामध्ये चतु:श्लोकी भागवत, भावार्थ रामायण, रक्मिणी स्वयंवर, एकादश स्कंदावरील टीका हे मुख्य ग्रंथ आहेत. तर हस्तामलक, स्वात्मसुख, शुकाष्टक, आनंदलहरी, चिरंजीवपद यासारखी स्फुट आध्यात्मिक प्रकरणे, काही पौराणिक आख्याने व संत चरित्रे आणि असंख्य अभंग व भारुडे आहेत. संत ज्ञानेश्वर लिखित ज्ञानेश्वरीचेही पहिल्यांदा शुद्धीकरण करुन ती शुद्ध प्रत लोकांना दिली. त्यामुळे त्यांना मराठी भाषेचे पहिले संपादक होण्याचा मान मिळतो. त्यांच्या या प्रचंड वाङ्मयाने केलेले लोकविलक्षण कार्य पाहून संत एकनाथ महाराज हेच महाराष्ट्राचे खरे नाथ आहेत, असे ज्ञानेश्वर महाराज जळगावकर डॉ. कुमुद गोसावी यांच्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात म्हणतात. जे की तंतोतंत खरे आहे.


संत एकनाथांचा जन्म १५३३ मध्ये पैठण येथे झाला. एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दन स्वामी यांना आपले गुरू मानले. त्यांच्याकडूनच एकनाथांनी वेदांत, योग, भक्तियोग यांचे शिक्षण घेतले. बराचसा काळ ध्यान आणि वेदाध्ययनात घालवला. गुरुंबरोबर तीर्थयात्रा केल्यानंतर त्यांनी गुरुंच्या आज्ञेनुसार गृहस्थाश्रम स्वीकारला. नाथांनी परिश्रम करून गुरुसेवा केली आणि साक्षात दत्तात्रेयांनी त्यांना दर्शन दिले. द्वारपाल म्हणून ते नाथांच्या द्वारी उभे असत, असे सांगितले जाते. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त, देवीभक्तही होते. मराठवाडा संतांची भूमी. त्या संतांच्या भूमीतील संत एकनाथांनी लोकोद्धाराचे महनीय, अतुलनीय असेच कार्य केलेले आहे नव्हे तर कृतीतून त्यांनी करुन दाखविले आहे. आधी केले मग सांगितले या उक्तीला आयुष्यभर महत्त्व देऊन प्राणीमात्रांबरोबर, सामान्यांतही देव त्यांनी शोधला. गुरु जनार्धन स्वामींकडून योगशास्त्राचे धडे घेतले. त्यांच्या आग्रहानुसारच गृहास्थाश्रमही स्वीकारले. भारत भ्रमणानंतर जीवनभर नाथांनी लोकप्रबोधनाचे कार्य केले. भक्तीची वाट दाखवली. जातीभेद, कर्मकांडाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. संत ज्ञानेश्वरांचे अपूर्ण राहिलेले कार्य त्यांनी पुढे नेऊन वारकरी संप्रदायाची पताका त्यांनी तेजाने तळपत ठेवली. कीर्तन, भारुडातून समतेची शिकवण दिली आहे. त्यांच्या या शिकवणीतून आपणही प्राणीमात्रांवर दयेचा, मानव कल्याणचा संकल्प करुयात, त्यांचा संदेश दूरपर्यंत पसरुया. भाविकांच्या या श्रीनाथ षष्ठी सोहळ्यासाठी व सोहळ्याच्या प्रवासासाठी शुभेच्छा देऊन शांती ब्रम्ह संत श्री एकनाथांच्या चरणी नतमस्तक होऊया! नाथांचे पणजोबा श्री संत भानुदास महाराजांनी कर्नाटकात श्रीकृष्णदेवरायाने नेलेली श्री विठ्ठरायाची मूर्ती पंढरीत परत आणली, हा इतिहास आहे. संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचा पाया म्हटले जाते, त्या ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर सुमारे २५० वर्षानंतर नाथांचा जन्म झाला आणि त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. ज्ञानेश्वरांची विस्मृतीत गेलेली ज्ञानेश्वर महाराजांची समाधी एकनाथांनी शोधून काढली आणि समाधीचा चौथरा आणि गाभारा बांधला. आळंदीची वारी पुन्हा सुरू केली.

फाल्गुन वद्य षष्ठीला संत एकनाथ समाधीस्त झाले. म्हणूनच फाल्गुन महिन्याच्या वद्य षष्ठीला एकनाथ षष्ठी असे संबोधले जाते. या दिवशी पाच घटना घडल्याने त्यांना पंचपर्वश्रेणी असं म्हणतात. नाथ स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस व पुण्यतिथी म्हणून यादिवशी उत्सव साजरा करीत. पुढे नाथांनीही याच दिवशी जलसमाधी घेतल्याने श्री एकनाथ षष्ठी म्हणून पुढे हा दिवस साजरा करण्यात येवू लागला. नाथषष्ठीला देखील यात्रा भरते. काल्याचे किर्तन केले जाते. अनेक ठिकाणा वरून दिंड्या आलेल्या असतात. नाथांच्या पादूकांची पालखी काढली जाते. पादूकांना गोदास्नान घालण्यात




येते. मंदिराच्या समोरील पटांगणावर टाळमृदुंगाच्या गजरात शेकडो भाविक पावल्या खेळण्यात तल्लिन होऊन जातात. मंदिराच्या बाजूस उंच ठिकाणी गुळ आणि लाह्या यांचे मोठेमोठे लाडू आकर्षकरित्या बांधण्यात येतात. औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणमधील नाथ षष्ठी सोहळा म्हणजे महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची यात्रा होय. पंढरपूर यात्रेखालोखाल लाखोंच्या संख्येने भाविक येथे येतात. सप्तमी, अष्टमीला मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होतो. मुख्य पालखीसोबत अंदाजे ६०० दिंड्या राज्यभरातून येथे येतात. यामध्ये जवळपास ४ लाखांपेक्षा अधिक भाविक श्री एकनाथ महाराजांच्या दर्शनाला महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरुन येतात. काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होते. दरवर्षी यात्रेचे सुनियोजन प्रशासनामार्फत केले जाते. !! एकनाथ षष्ठीच्या पावनपर्वावर संतश्रेष्ठ एकनाथजी महाराजांच्या चरणी शतशः विनम्र अभिवादन !!

# कौसडीत ख्वाजा कमालोद्दीन दर्गाचा संदल उत्साहात



**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील ख्वाजा कमालोद्दीन दर्गा चा संदल दिनांक २९ मार्च गुरुवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ख्वाजा कमालोद्दीन दर्गाच्या संदल चे आयोजन करण्यात आले होते. दर्गाची रंगरंगोटी करून आकर्षक विद्युत रोषणाईने सजावट करण्यात आली होती. या संदल निमित्त बाहेरगावच्या भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती.

गुरुवार रोजी सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे कार्यक्रम संपन्न झाले. तर तराबीच्या नमाज नंतर रात्री ९ वाजता ढोल ताशांच्या गजरात घोड्यावरून ठरल्या मार्गाने गावातून संदलची मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीमध्ये नागरिकांची एकच गर्दी पाहायला मिळाली रात्री १०:३० वाजता ख्वाजा कमालोद्दीन दर्गावर चादर चढविण्यात आली. बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार सिद्धार्थ कोकाटे पो.कॉ. अनिल शिंदे पो.कॉ. शरद सावंत पोलीस पाटील प्रतिनिधी संभाजी इखे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी मिरवणुकी दरम्यान बंदोबस्त ठेवला होता. संदल संपन्न झाल्यानंतर कव्वाल शेख सब्दर व त्यांच्या टीमचा कव्वाली चा कार्यक्रम घेण्यात आला. ख्वाजा कमालोद्दीन दर्गा संदल कार्यक्रमासाठी शेख समद, शेख अली, शेख जाकेर, शेख चांद पाशा, हाजी शेख इब्राहिम, शेख रियासोद्दीन, शेख सलावोद्दीन, शेख जमाल, शेख हुजूर, शेख राज मोहम्मद, शेख नसिर,शेख बिलालोद्दीन, शेख एजाज, शेख आयनोद्दीन, शेख खाजामिया, शेख सल्लू, शेख मुख्तार, शेख असलम, शेख असेफ यांच्यासह संदल कमिटीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले होते.

# निपुण जिंतूर विषयाच्या संदर्भाने मुख्याध्यापकांची आढावा बैठक संपन्न

**जिंतूर । प्रतिनिधी**

गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले जिंतूर तालुक्याचा शैक्षणिक विकास करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येत आहेत. मागील काही महिन्यात त्यांच्या शैक्षणिक उपक्रम व कार्यक्रमामुळे त्यांच्या कार्याचा नावलौकिक सबंध जिल्हाभर होत आहे. दर्जेदार पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हे ध्येय निर्धारित करून या ध्येयाच्या साध्यतेसाठी वैविध्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन वर्षभरात गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले.



जिंतूर तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करून या सत्राच्या अखेरीस संपूर्ण जिंतूर तालुका निपुण करण्याचे प्रयत्न आहेत. या दृष्टीने शाळेच्या सद्यस्थितील शैक्षणिक स्थितीची आढावा घेण्यासाठी दि. २६ व २७ मार्च रोजी ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर येथे सर्व मुख्याध्यापक यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.या बैठकीत निपुण जिंतूर, आगामी वर्षातील शैक्षणिक गुणवत्ता विकासाचे नियोजन, मतदार जनजागृती (डतएएझ) कार्यक्रम, जपश्रळपश मिटिंग या विषयावर मयूर जोशी, शालेय पोषण आहार या विषयावर विकास सातभाई, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या विषयावर देवानंद सावंत, कार्यालयीन कामकाज या विषयावर राजेंद्र ढाकणे, णवळीश श्रिंी व इतर शालेय जपश्रळपश कामे या विषयावर लक्ष्मण टाकणसार, समाजकल्याण शिष्यवृत्ती आवेदनपत्र जपश्रळपश भरणे या विषयावर भास्कर मुंढे, खपर्षीळी लेरीव वर फिरस्त्या चित्रपट दाखवणे या विषयावर अनिल स्वामी, व्हाट्सअप ग्रुपची नियमावली या विषयावर नितीन पेठे, मतदार जनजागृती (डतएएझ) विषयावर कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जिंतूर च्या विद्यार्थिनींनी पथनाटच्याचे सादरीकरण केले. तर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रबोधनात्मक मतदानाचे महत्त्व सांगणारे गीत गौतम खिल्लारे यांनी सादर केले.गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी आपल्या मार्गदर्शनात या वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्ता विकासासाठी जेवढे उपक्रम व कार्यक्रम राबवले त्यापेक्षा अधिक उपक्रम व कार्यक्रम पुढील वर्षात पूर्ण क्षमतेने राबवावयाचे आहेत. सर्वार्थाने जिंतूर तालुका निपुण करण्यासाठी परिपूर्ण प्रयत्न करायचे आहेत. यासाठी सर्वांनी तयारीला लागू या... सूक्ष्म नियोजन करून समर्पित भावनेने शैक्षणिक सेवा देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सिद्ध होऊयात असे प्रतिपादन केले. संपूर्ण आढावा बैठकीचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले.या आढावा बैठकीसाठी केंद्रप्रमुख तुकाराम साबळे, मारोती घुगे, पांडुरंग भांबळे, दिनकर घुगे, शंकर चव्हाण, शिवाजी कऱ्हाळे, निलेश लटपटे, अतीक अन्सारी, संजय स्वामी यांच्यासह सर्व उच्च श्रेणी मुख्याध्यापक, व सर्व शाळा प्रमुख उपस्थित होते.

## व्यायाम शाळेने साकारला महाराजांच्या राजवाड्याचा आकर्षक देखावा

# केडगावमध्ये जयंती उत्सवाबरोबर राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम कौतुकास्पद -धनश्रीताई विखे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

केडगाव येथील भैरवनाथ पतसंस्थे समोर संदीप दादा कोतकर युवा मंच आणि संदीप व्यायाम शाळेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे जयंती साजरी करण्यात आली. चौकात भव्य स्टेजवर राजवाड्याची सजावट करुन शिवाजी महाराजांची सिंहासनावरील आकर्षक मुर्ती अभिवादनासाठी ठेवण्यात आली होती. यावेळी युवकांनी जय भवानी... जय शिवाजी... च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

प्रारंभी धनश्रीताई सुजय विखे पाटील आणि उद्योजक सचिन (आबा) कोतकर यांच्या



हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, संदीप दादा युवा मंचचे अध्यक्ष भूषण गुंड, भाऊ बारस्कर, माजी नगरसेविका लताताई शेळके, गौरीताई ननावरे, सविता अशोक कराळे, शकुंतला पवार, सुनिता कांबळे, राहुल कांबळे, सागर सातपुते, बापू सातपुते, गणेश सातपुते, गणेश नन्नवरे, नवसुपे महाराज, अजित पवार, सोमनाथ बनकर, सुरज शेळके, सोनू घेंबुड, सुमित लोंढे, अतुल दरंदले, राजू लोंढे, विक्रम वीरकर आदींसह परिसरातील व्यापारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धनश्रीताई विखे यांनी संदीप दादा कोतकर युवा मंच आणि संदीप व्यायाम शाळेच्या माध्यमातून महापुरुषांच्या जयंती उत्सवाबरोबर राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असून, संस्कृती जोपासून महापुरुषांचे विचार रुजविण्याचे कार्य केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सचिन (आबा) कोतकर यांनी शिवजयंतीच्या केडगावच्या ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या.

# रंगपंचमीसाठी विद्यार्थ्यांनी बनवले नैसर्गिक रंग




**अहमदनगर । प्रतिनिधी**

सामाजिक वनीकरण विभाग व हरियाली संस्थेच्या वतीने रंगपंचमीनिमित्त नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळा राबविण्यात आली. विविध शाळेत फळे, फुले, पाने यांपासून आकर्षक व शरीराला हानिकारक नसलेली पर्यावरणपुरक रंग निर्मितीचे धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील रंगपचमीत रासायनिक रंगाचा वापर न करता, नैसर्गिक रंगांचा वापर करण्याचा संकल्प केला. या कार्यशाळेत ३ हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून नैसर्गिक रंग तयार केले.

शहरातील दादा चौधरी विद्यालय, रेणावीकर विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, प्रगत विद्यालय व निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत सामाजिक वनीकरणचे वन परीक्षेत्र अधिकारी हेमंत उबाळे यांनी विविध आजार व विकार यांचा सामना करायचा नसेल, तर घरच्या घरी नैसर्गिक रंग निर्माण करुन रंगपंचमी उत्साहात साजरी करावी. ग्रामीण भागात पाणी टंचाई असून, पशु-पक्षी देखील पाण्यासाठी भटकंती करत असताना, नागरिकांनी रंगपंचमीत मोठ्या प्रमाणात होणारा पाण्याचा अपव्यय कमी करुन या सण-उत्सवाचा आनंद घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी रासायनिक रंगाचे दुष्परिणाम सांगताना काळा, हिरवा, सिल्वर, निळा, लाल हे रंग ऑक्साईड, कॉपरसल्फेट, ल्युमिनीयम ब्रोमाईड, प्रशियन निळ, मक्युरी सल्फाईट या रसायनापासून रंग तयार करण्यात आलेले आहे. हे सर्व रसायने त्वचेला घातक असून, त्यांपासून मूत्रसंस्थेचे कार्य बंद पडणे, डोळ्यांना लर्जी, डोळे सुजणे व तात्पुरता आंधळेपणा, कॅन्सर, त्वचेचे विविध आजार होतात. हे सर्व दुष्परिणाम टाळण्यासाठी नैसर्गिक रंग सर्वोत्तम पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून बिट फळापासून जांभळा रंग, बेलफलाची साल, हळद यांपासून पिवळा रंग, आवळा व कोळसा पासून काळा रंग, जास्वंद, पळस, झेंडू, गुलाब यांपासून लाल रंग, गहू, ज्वारी, पुदिना, पालक यांपासून हिरवा रंग तर कपड्याची निळ पासून निळा रंग विद्यार्थ्यांनी बनविले.या कार्यशाळेसाठी वनपाल, सचिन गायकवाड, वनरक्षक अफसर पठाण, मुख्याध्यापक सुभाष येवले, सायसिंग वसावे, उत्तम कांडेकर, मुख्याध्यापिका नंदा कानेटकर, शिक्षक अजय महाजन, प्रदीप भोसले, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, अमोल वाबळे, तृप्ती वाघमारे, सुवर्णा जाधव, दिलीप परसपाटकी, प्रिया आहिरे, वैशाली डफळ आदी उपस्थित होते.

# निवडणुकीपूर्वी इच्छुक उमेदवारांची पोलिग्राफ टेस्ट करा-ॲड.राकेश राऊळ

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतात सध्या सुरू असलेल्या राम राज्यात निवडणुकांचे जोरदार वारे वाहू लागले आहेत.मात्र राम राज्यात होणाऱ्या सर्व प्रकारच्या निवडणुकांपूर्वी प्रत्येक उमेदवाराने आपली पॉलिग्रफ टेस्ट देऊन आपण भ्रष्टाचारी ,खुनी _.बलात्कारी नाही. असे सिध्द करावे .या मागणीसाठी ऍड श्री राकेश राऊळ हे गेल्या चाळीस दिवसांपासून मुंबईतल्या आझाद मैदानात अमरण उपोषणास बसले आहेत.

..इच्छुक.उमेदवारांची अशा प्रकारे चाचणी केली तर एक स्वच्छ चारित्र्याचा नेता उदयास येईल .तसेच राजकीय आणि सामाजिक . आभिसरणात एक आदर्श शासनकर्ता प्रजाहितदक्ष कल्याणकारी उत्तम प्रशासन लाभलेली परंपरा निर्माण होऊन राज्य कारभारात पारदर्शकता येईल .त्याच लाभ तळागाळातील समाजापर्यंत होईल असेही त्यांनी म्हटले आहे. अडरच्या आहावलानुसार सध्याच्या लोकसभेत अर्थात संसदेत ५४३ पैकी २३३(४३टक्के) तर.राज्यसभेत २२६ पैकी ७१(३१ टक्के) खासदारांवर (लोकप्रतिनिधींवर) हत्या , खुन खुनाचा प्रयत्न बलात्कार ,अपहरण.,,सामजिक शांतता भंग करणे,दंगल माजवने अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

एन सी आर.बी च्यां २०१९चां नोंदी आणि अहवालानुसार अनेक नेत्यांच्या विरोधात ९४२७ पेक्षा जास्त गुन्ह्यांची नोंद न्यायालयात आहे.त्यातील ४०२९ खटले हे भ्रष्टाचार संबंधित आहेत.५०००पेक्षा जास्त केसेस ह्या आजी माजी आमदार तथा लोकप्रतिनिधींवर आहेत. २०२४. च्या होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत असे चारित्र्यहीन उमेदवार असू नयेत.म्हणून प्रत्येक उमेदवाराची पोलिग्राफ टेस्ट घेणेच उचित ठरेल .प्रत्येक लोकप्रिनिधीं हा चारित्र्यवान असायला हवा .५४३ खासदारांसाठी.१४० कोटी जनतेने आपले.भविष्य पणाला.का लावावे ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे..शासन ,प्रशासन आणि देशातील सर्व सामान्य माणूस यांच्यात एक पारदर्शक सलोखा निर्माण होऊन भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी मुक्त यंत्रणा उभी राहील. त्यातून .देशाचा विकास साधला जाईल .यासंदर्भात राऊळ यांनी सर्वोच्च स्थानी असलेल्या नेतेमंडळी बरोबर पत्र व्यवहार केला पण त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.असा दावा ऍड श्री राकेश राऊळ यांनी केला आहे. देशातील लोकशाही व्यवस्था कायम टिकवून ठेवण्यासाठी आणि सध्याच्या हुकूमशाही पासून वाचविण्यासाठी भारताच्या संविधानाचे रक्षण करणे साठी प्रत्येक उमेदवाराची पॉलिग्राफ टेस्ट होणे. अनिवार्य आहे.बंधनकारक आहे.असे मत त्यांनी शेवटी मंडलेआहे .

# नीलेश लंके यांनी रणशिंग फुंकले

# आमदारकीचा राजीनामा, अजित पवारांना मोठा धक्का ;नगरमधून लोकसभा लढवण्याची घोषणा

**अहमदनगर (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे आमदार नीलेश लंके यांनी अखेर आमदारकीचा राजीनामा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ते शरद पवार गटात जाण्याची चर्चा सुरू होती. या संदर्भात आयोजित कार्यक्रमात नीलेश लंके यांनी शरद पवार यांचे तुतारी चिन्ह हातात देखील घेतले होते. मात्र, तशी कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आली नव्हती. मात्र, आज नीलेश लंके यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देत अहमदनगर लोकसभा मतदार संघातून निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या विरुद्ध नीलेश लंके अशी ही तुल्यबळ लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमदार नीलेश लंके हे आता अहमदनगर मधून शरद पवार गटाचे उमेदवार असतील त्यामुळे हा अजित पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या विरोधात आता नीलेश लंके मैदानात उतरले आहे. आपल्या पहिल्याच भाषणात त्यांनी विखे पाटील पिता-पुत्रा विरोधात रणशिंग फुंकले आहे. या वेळी लंके यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले.मतदार संघातील सर्व मतदारांची मी माफी मागतो. त्यांनी मला पाच वर्षांसाठी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले होते. मात्र, लोकसभेला सामोरे जायचे असेल तर हा कठोर



निर्णय घ्यावा लागणार आहे. चार महिने शिल्लक असतानाच हा कटू निर्णय मला घ्यावा लागत असल्याचे म्हणत नीलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा दिला आहे. 'कम से कम दोन लाख' असे म्हणत आपण दोन लाख मतांनी लोकसभा निवडणुकीत विजय मिळवणार असल्याचा विश्वास देखील लंके यांनी व्यक्त केला.रावणाचा देखील अंत झाला होता, त्यात तुम्ही कोण आहात? असा प्रश्न करत आमदार नीलेश लंके यांनी भारतीय जनता पक्षाचे नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका केली आहे. नगरच्या पालकमंत्र्यांनी मला संपवण्याचा घाट घातला असल्याचा आरोप नीलेश लंके यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या माध्यमातून नीलेश लंके यांनी आज आक्रमक भाषण करत कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या आहेत.मी सामान्य कुटुंबातील व्यक्ती आहे. माझ्यामुळे तुम्हाला घाम फुटण्याची गरज काय? असा प्रश्न नीलेश लंके यांनी उपस्थित केला. दुसऱ्यांच्या झेंडावर पंढरपूर करणारी आमची अवलाद नाही, असे म्हणत त्यांनी विद्यमान खासदार सुजय विखे पाटील यांच्यावर देखील टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तुम्ही केलेले आजपर्यंत एक तरी भाषण दाखवा असे आवाहन देखील लंके यांनी सुजय विखे पाटील यांना दिले आहे.

# बुध्द धम्माचे आचरण करणे गरजेचे - डॉ.हत्ती अंबीरे

**परभणी । प्रतिनिधी**

धम्माचे कार्य मोठ्या प्रमाणावर झाले पाहिजे यासाठी बुध्द विहार निर्माण होत असून सर्वांनी धम्माचे आचरण करणे गरजेचे आहे, असे मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिध्दार्थ हत्तीअंबीरे यांनी व्यक्त केले.मौजे बाभूळगाव (ता. वसमतनगर जिल्हा हिंगोली) येथे शुक्रवारी (दि.२९) आमदार राजू नवघरे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या नूतन बुद्ध विहारात थायलंड येथील ६ फुटाच्या बुद्धरूप मूर्तीचा प्रतिष्ठापना व धम्म देशना समारंभ धम्ममय वातावरणात पार पडला. यावेळी भिक्खू संघपाल थेरो, भिक्खू संघ, सामाजिक कार्यकर्ते ॲड. रणधीर तेलगोटे, कॉन्ट्रक्टर यशवंत उबारे, भीम टायगर सेनेचे एंगडे, अक्षय जगताप, पत्रकार मंचक खंदारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सिद्धार्थ हत्तीअंबिरे म्हणाले कि, येणार्या काळात गावागावात ज्या ठिकाणी बुद्ध विहार निर्माण होईल तेथे बुद्धांच्या मूर्तीची




स्थापना झाली पाहिजे, असे मत व्यक्त करीत बौध्द उपासक, उपासिकांनी बुध्द वंदना, धम्माचे कार्य व त्याचबरोबर विहाराची स्वच्छता राखावी, असे आवाहन केले. आमदार नवघरे यावेळी म्हणाले की, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांनी थायलंड येथून बुद्धांची मूर्ती उपलब्ध करून दिली आहे. बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आपण अवलंब केला पाहिजे. कारण, डॉ. बाबासाहेबांच्या घटनेमुळे माझ्या सारख्या सामान्य माणूस आमदार झाला आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस बुद्धपूजा विधी व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा बुध्द विहार समिती ग्रामस्थांनी सत्कार केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समस्त बुद्ध विहार समिती, महिला मंडळाने परिश्रम घेतले.

## परभणी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी

# पाथरी विधान सभा क्षेत्रातील नियुक्त मतदान अधिकार्यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न





**पाथरी । प्रतिनिधी**

परभणी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पाथरी विधानसभा क्षेत्रातील नियुक्त केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी एकूण १८७७ कर्मचाऱ्यांचे निवडणूक संदर्भातील कामकाजा विषयीचे पहिले प्रशिक्षण सत्र दिनांक २९ मार्च२०२४ शुक्रवार रोजी दोन सत्रात नवीन शासकीय गोदाम औद्यागिक प्रशिक्षण संस्था जवळ विटा रोड पाथरी येथे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.

उपस्थित सर्व मतदान अधिकारी यांची हजेरी नोंदवण्यात साठी २२ टेबलावर व्यवस्था करण्यात आली मतदान अधिकाऱ्यांच्या आपले मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पोस्टल बॅलेट पेपरची व्यवस्था करून देण्यात येणार असल्या मुळे निवडणूक कर्मचारी कडून फॉर्म नंबर १२ भरून घेण्यात आले. कंट्रोल युनिट सील करणे व विविएम पॅड जोडणी करणे मॉक पोल करणे प्रत्यक्ष निवडणूक दिवशी निवडणूक कामात येणाऱ्या अडचणी व मतदान अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर मार्गदर्शन माननीय श्री लाहोटी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पाथरी यांनी केले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तहसीलदार पाथरी मानवत सोनपेठ व निवडणूक कामासाठी नियुक्त इतर सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# युवा नेते गणेश भालसिंग यांची उपाध्यक्षपदी निवड

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील वाळकी गावचे रहिवासी व तरुण नेतृत्व गणेश भैय्या भालसिंग यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या अहिल्या नगर दक्षिण उपाध्यक्षपदी जिल्हा अध्यक्ष व युवकांचे प्रेरणास्थान अक्षय दादा कर्डिले यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड केली आहे. गणेश भैय्या भालसिंग यांचा जिल्ह्यात मोठा जनसंपर्क असुन ,तरुण वर्ग त्यांच्या पाठीशी आहे. ते जिल्हा अध्यक्ष दिलीप भाऊ भालसिंग याच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे संघटन चांगल्या प्रकारे करतात. त्यांचे पक्षाचे कार्य फार मोठे आहे. याचीच पावती म्हणून गणेश भैय्या यांची निवड केली आहे. या निवडी बाबतीत ग्रामीण भागातील तरुणांना हक्काचा माणूस भेटला आहे. यांच्या निवडीचे स्वागत खासदार सुजय दादा विखे पाटील, पालकमंत्री डॉ . राधाकृष्ण विखे पाटील , माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, माजी मंत्री आमदार बबन दादा पाचपुते, जिल्हा अध्यक्ष दिलीप भाऊ भालसिंग, आमदार राम शिंदे, आमदार मोनिका ताई राजळे, बाबासाहेब वाकळे, व सर्व आघाडीचे जिल्हाध्यक्ष, सरचिटणीस, पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या हातून भारतीय जनता पार्टीचे ध्येय, धोरणे, योजना, जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी म्हणून हि निवड झालेले बोलले जात आहे. आणि पुढील राजकीय वाटचालीत मनापासून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# आचार्य श्री.कुंदनऋषीजी महाराज यांनी दिली सुजय विखे पाटलांना विजयाची निश्चिती

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर जिल्ह्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना जैन समाजाचे गुरू संत श्री. कुंदनऋषीजी महाराज यांनी महायुतील भाजपाचे लोकसभेचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांना विजय निश्चितीचे आशिर्वाद दिले. यामुळे जैन समाजाचे पाठबळ विखे पाटील यांना लाभले असून त्यांच्या मताधिक्यात मोठी वाढ होणार आहे. राष्ट्रसंत आचार्य श्री.आनंदऋषीजी महाराज यांच्या ३२ व्या स्मृतीदिनानिमित्य नगर शहरात साजरा केल्या जाणाऱ्या महोत्सवाच्या निमित्याने सुजय विखे पाटील यांनी कुंदनऋषीजी महाराज यांची भेट घेऊन आशिर्वाद घेतले होते. यावेळी कुंदनऋषीजी महाराज यांनी त्यांना आशिर्वाद देताना तुमचा विजय निश्चित असल्याचे सांगितले.



नगर जिल्ह्यात राष्ट्रसंत आचार्य श्री.आनंदऋषीजी महाराज यांच्या ३२ व्या स्मृतीदिनानिमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी स्टेशन रोड ते आनंदधाम आश्रम पर्यंत शांती मार्च चे आयोजन करण्यात आले होते. या मार्च मध्ये सुजय विखे पाटील यांनी सहभाग आपला नोंदविला. त्यानंतर त्यांनी आनंदधाम येथे कुंदनऋषीजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले. तसेच या प्रसंगी आयोजित रक्तदान शिबीराला भेट देत रक्तदात्यांचे अभिनंदन केले. आनंदधाम येथे येणाऱ्या भाविकांना शरबत वाटून सेवाकार्यात भाग घेतला. जैन समाजाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सुजय विखे पाटील यांचा सत्कार करत त्यांना आचार्य श्री.आनंदऋषीजी महाराज यांचे तैलचित्र भेट देऊन येणाऱ्या निवडणुकीत जैन समाज आपल्या बरोबर असल्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी आमदार संग्राम जगताप याच्यासह जैन समाजाचे प्रतिनिधी, हस्तीमल मनोद, अभय आगरकर, नितीन कुणकोळ वसंत लोढा, प्रेमजी बोथरा, संतोष बोरा, बाबूसेठ कवरा, निखील लोढा आदी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमधील कलाकार ओळखण्यात शिक्षकांची मोलाची भूमिका-उपआयुक्त (शिक्षण) चंदा जाधव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मध्यवर्ती बाल चित्रकला स्पर्धा, 'मुंबई' या विषयावर आयोजित खुली छायाचित्रण स्पर्धेतील विजेते आणि 'माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानांतर्गत विशेष योगदान दिलेल्या शाळा व शिक्षकांचा महानगरपालिकेतर्फे गौरव

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेसह इतर कला-गुणही तितकेच आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी रेखाटलेली चित्रे त्यांच्यातील कलागुणांना वाव देणारी आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत अधिक वाढ करण्यासाठी सगळे मिळून प्रयत्न करूया. त्यासाठी शिक्षकांना मोलाची भूमिका बजावावी लागणार आहे. तसेच या स्पर्धेत चित्तारलेली चित्रे तसेच टिपलेली छायाचित्रे लवकरच मुंबईतील प्रसिद्ध कला दालनात प्रदर्शित करण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उप आयुक्त (शिक्षण) श्रीमती चंदा जाधव यांनी दिले. मध्यवर्ती बाल चित्रकला स्पर्धा आणि 'मुंबई' या विषयावर आयोजित खुली छायाचित्रण स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ आणि 'माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानांतर्गत विशेष योगदान दिलेल्या शाळा व शिक्षकांचा गौरव आज (दिनांक २८ मार्च २०२४) भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील पेंग्विन सभागृहात पार पडला. यावेळी संबोधित करताना उप आयुक्त श्रीमती जाधव बोलत होत्या. महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. राजेश कंकाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. राजू तडवी, उपशिक्षणाधिकारी श्रीमती सुजाता खरे, उपशिक्षणाधिकारी (समग्र शिक्षा अभियान) श्रीमती संगीता तेरे, उपशिक्षणाधिकारी श्री. निसार खान, कला विभागाचे प्राचार्य श्री. दिनकर पवार आदींसह सहकारी कला निदेशक, केंद्र प्रमुख शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.श्रीमती जाधव म्हणाल्या, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थी घडतात. शैक्षणिक परीक्षांसह इतर कला-गुणांना वाव देणाऱ्या स्पर्धा आयोजित करून मुलांना विविध क्षेत्रात करियर करण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये पाहणी करून विद्यार्थ्यांचे वाचन, गणित आणि विज्ञानासह इतर विषयांचा अभ्यासाचा आढावा घेतला जाईल, असेही त्या म्हणाल्या.प्रास्ताविकात शिक्षणाधिकारी श्री. राजेश कंकाळ म्हणाले, विद्यार्थ्यांमधील कलाकाराला वाव देण्यासाठी अशा स्पर्धा टर्निंग पाईंट ठरतात. ज्याच्याकडे शिक्षणासह वेगळी कला आहे, कौशल्य आहे अशा विद्यार्थ्यांना येत्या काळात रोजगाराच्या अधिक



संधी असतील, असेही श्री. कंकाळ यांनी सांगितले. या स्पर्धेचे परीक्षक ज्येष्ठ छायाचित्रकार तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त श्री. सुधारक ओलवे यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले. ही चित्रे आणि छायाचित्रे केवळ मुंबईतच नव्हे तर परराज्यात आणि परदेशातील प्रदर्शनात मांडण्याच्या दर्जाची आहेत, असेही त्यांनी नमूद केले. महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे 'मध्यवर्ती बाल चित्रकला स्पर्धेत' २२ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत इयत्ता १ ली ते २ री, इयत्ता ३ री ते चौथी, इयत्ता ५ वी ते ६ वी आणि इयत्ता ७ वी ते ८ असे चार गट होते. याशिवाय विशेष विद्यार्थ्यांचाही एक गट होता. या स्पर्धेसाठी भूषण उदगीरकर, योगेश मोरे, प्रफुल्लता कुंभार यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. 'मुंबई' या विषयावरील खुली छायाचित्र स्पर्धेत महानगरपालिका कर्मचारी गट, मुंबईतील छायाचित्रकार गट आणि शालेय विद्यार्थी गट होते. या स्पर्धेसाठी ज्येष्ठ छायाचित्रकार तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त श्री. सुधारक ओलवे, छायाचित्रकार श्री. मनोज मुसळे आणि डॉ. अभिषेक साटम यांनी परीक्षकांची जबाबदारी पार पाडली. श्री. दिनकर पवार यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल-मध्यवर्ती बाल चित्रकला स्पर्धेत पहिली ते दुसरी या गटात साक्षी मौर्य (इयत्ता दुसरी, संत कक्कय्या हिंदी शाळा), तिसरी ते चौथी या गटात अनायका सोनी (इयत्ता चौथी, गुरूनानक नगर शाळा), पाचवी ते सहावी या गटात प्रिती जैसवार (इयत्ता पाचवी, कुर्ला नौपाडा शाळा), सातवी ते आठवी या गटात सायमा शेख (इयत्ता आठवी, शिवडी क्रॉसरोड शाळा) आणि विशेष विद्यार्थी गटात हिमांशू माळी (रा. प. मार्ग शाळा) या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

मुंबई या विषयावर खुली छायाचित्र स्पर्धेत महानगरपालिका कर्मचारी गटात श्री. प्रशांत कांबळे (शिक्षण विभाग), श्री. ऋषाल अनाप (खुला गट), कु. साहिल शाहिद सय्यद (विद्यार्थी गट) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.याशिवाय 'माझी शाळा सुंदर शाळा' या अभियान अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मुंबई पब्लिक स्कूल पोयसर हिंदी शाळा क्रमांक ३, शिवडी क्रॉसरोड मुंबई पब्लिक स्कूल, विक्रोळी पार्कसाईट महानगरपालिका इंग्रजी शाळा, के. एल. मेहरा यू. बी. एस. इंग्रजी प्राथमिक शाळा, सी. ई. एम. मायकेल हायस्कूल प्राथमिक विभाग आणि सेंट कोलंबा प्राथमिक शाळा यांचा गौरव करण्यात आला. तसेच श्रीमती अगा परवीन, श्रीमती रुपाली बारी, श्रीमती आशा ब्राह्मणे, श्री. महेश गुंजाळ, श्रीमती अंजू म्हात्रे, श्रीमती सरिता गावडे या शिक्षकांचाही प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

सह्याद्रीचा राखणदार



# वरोऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांचे आयोजन ;शिवजयंती निमित्त राबविण्यात आले विविध उपक्रम









**वरोरा । प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवसेना महिला आघाडी, अखिल भारतीय मारवाडी राजस्थानी महिला मंडल, धनोजे कुणबी महिला आघाडी, इनर्व्हिल क्लब व माहेश्वरी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने रांगोळी स्पर्धा व वेशभूषा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्थानिक गांधी उद्यान येथे आयोजित रांगोळी स्पर्धेत शेकडो महिलांनी सहभाग घेतला होता. यानंतर गांधी चौक येथे वेशभूषा स्पर्धा ठेण्यात आली होती.यावेळी चिमुक्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संभाजी महाराज, सुभाषचंद्र बोस, चाचा नेहरू, रमाई, महात्मा गांधी व विविध वेशभूषा धारण करून आपल्या कलेचे प्रदर्शन केले.

यादरम्यान शिवसेनेच्या वतीने रांगोळी व वेषभुषा स्पर्धकांना सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.तसेच शिवसेना महिला आघाडीच्या वतीने अखिल भारतीय मारवाडी राजस्थानी महिला मंडळ, धनोजे कुणबी महिला आघाडी, इनर्व्हिल क्लब व माहेश्वरी महिला मंडळ यांच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केले तर सूत्रसंचालन युवासेना माजी जिल्हाप्रमुख व गोंदिया जिल्हा विस्तार मनिष जेठानी यांनी केले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमित निब्रड, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले,युवासेना जिल्हा सनमवयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव,तालुका प्रमुख विपीन काकडे, शहर प्रमुख संदीप मेश्राम, शहर संघटक किशोर टिपले, शिवदूत बंडू डाखरे,शिवदूत बालाजी जिवतोडे,माजी उपजिल्हा प्रमुख रमेश मेश्राम,शिवसेना विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे युवासेना विधानसभा समन्वयक , उपशहर प्रमुख गजू पंधरे, उपशहर प्रमुख मनिष दोहतरे,उपशहर प्रमुख राहुल दारुण्डे,उपतालुका प्रमुख लक्ष्मण ठेंगणे, उपतालुका प्रमुख महेश देवतळे, उपतालुका प्रमुख सागर पिपंळशेंडे,विभाग प्रमुख प्रकाश कुरेकार, कामगार सेना तालुका प्रमुख हनुमान ठेंगणे,युवासेना विधानसभा सनमवयक निखिल मांडवकर,युवासेना तालुका प्रमुख ओंकार लोडे,अनिल गाडगे, पियुष जगताप,प्रसाद खडसान,तुषार पाल, रुपेश चिंचोलकर, राकेश टापरे,माजी नगर सेविका सुषमा भोयर, माजी नगरसेविका प्रणाली मेश्राम, माजी नगरसेविका,दिपाली टिपले,उपतालुका संघटिका अल्का पचारे,वंदना डाखरे, रीमा जिवतोडे,रोहिणी जिवतोडे,युवती सेना तालुका प्रमुख तेजस्वी हनुवते व समस्त शिवसैनिक, युवासैनिक, महिला संघटिका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्या कटातून पुरस्कार प्राप्त उपसरपंचावर हमला

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत नवे नवनवीन संकल्प व उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. येथील उपसरपंच वैभव बाबाराव ठाकरे हे ग्रामपंचायतीच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेऊन नवीन नवीन योजना राबवीत असतात. त्यांना याबाबत अनेक पुरस्कार मिळालेले असून आंबोली ग्रामपंचायतीचे नाव चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अग्रस्थानावर कशी राहील यासाठी हा उपसरपंच असलेला युवक नेहमीच विकासात्मक नवनवीन प्रयोग करण्यात अग्रेसर असतो. या उपसरपंचाने महाराष्ट्रातील आदर्श गाव पाटोदा ग्रामपंचायतीचे सरपंच भास्करराव पेरे पाटील याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आंबोली येथे शैक्षणिक सामाजिक तसेच आर्थिक तसेच विकासात्मक कार्य करत नवीन नवीन संकल्पना अमलात आणत गावाचा विकास करीत आहेत.




त्याच संकल्पनेतून उपसरपंच असलेला हा युवक पुढाकार घेऊन त्यांनी वेळेवर घर टॅक्स भरला नाही, किंवा नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी अशा कुटुंबाच्या घरी जाऊन व सोबत ग्रामपंचायत चपराशी रोजगार सेवक व इतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन स्वतः गावातील घर टॅक्स प्रत्येक वर्षी वसूल करीत असतो. व नागरिकांच्या समस्या ऐकून घेत असतो. त्याचप्रमाणे दिनांक २९ मार्चला हे उपसरपंच गावात ग्रामपंचायतची वसुली करीत असताना अनिल विठोबा जांबुडे यांना रोड वरूनच टॅक्स बाबत व काही समस्या असल्यास विचारले असता, अनिल जांबुडे यांनी रोडवर येऊन उपसरपंच यांचेवर जुन्या राजकीय कटातून हल्ला केला व उपसरपंच यांना मारहाण केली. उपसरपंच वैभव ठाकरे यांनीही आपला जीव वाचवण्यासाठी प्रतिकार केला, व सोबत असलेले सहकारी धावून आले आणि सोडवणूक केली. अनिल जांबुडे हा मागील ग्रामपंचायत बॉडी मध्ये ग्रामपंचायत सदस्य होता. या ग्रामपंचायत मध्ये मागील निवडणुकीत पदवीधर युवकांनी पदवीधर युवकांची स्वतंत्र पॅनल निर्माण करून संपूर्ण पॅनल निवडून आणली. त्यामध्ये दोनदा अनिल जांबुडे यांचा फार मोठ्या फरकाने पराभव झाला. त्याचा वचपा काढण्याच्या कटातून उपसरपंच वैभव ठाकरे यांच्यावर हल्ला केला अशी गावकऱ्यांमध्ये चर्चा आहे. या प्रकरणात दोघांनी ही एकमेकांना मारहाण केली. एकमेकांचे शर्ट, बटना फाडल्या, त्यानुसार दोघां वरती कलम ३२३ ५०४ व ५०६ नुसार कारवाई करण्यात आली. अशी माहिती पोलिसांनी दिली.

# ग्रामीण भागात रंगत आहेत निवडणुकीच्या चर्चा

**चिमूर । शेषराव राऊत**

सध्या ग्रामीण भागात लोकसभेच्या निवडणुकीच्या चर्चांना वेग येत असून गावातील चौका चौकात या निवडणुकी विषयी अनेक प्रकारचे मत मतांतरे आपसी चर्चेतून ग्रामीण नागरिक व्यक्त करीत आहेत. गावातील चावडीवर नागरिक एकत्र बसतात व यामध्ये अनेक राजकीय विषयावर तसेच निवडणुकीबाबत चर्चा रंगायला नेमकी सुरुवात झाली असून कोणत्या पक्षाचा उमेदवार कोण आहे. तसेच सत्ताधारी पक्षाचे उमेदवाराने कोणती विकासाची कामे केली. यावेळेला सत्ताधारी पक्षाचा उमेदवार येणार की, विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून येणार याविषयी चर्चेला उधाण आले आहे.



यामध्ये प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता हा आपापल्या पक्षाची बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत असून त्यामध्ये वाद विवाद भांडणे सुद्धा होताना दिसत आहेत. प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते हे एकमेकांच्या पक्षाच्या चुका उमेदवाराच्या चुका यावर टीका करताना दिसत असून, आपल्याच पक्षाचा उमेदवार कसा योग्य आहे, हे मतदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या चर्चांना नेमकी सुरुवात झाली असून दिवसेंदिवस या चर्चांना वेग येणार आहे.ग्रामीण भागात सध्या लग्नसराई सुरू असून लग्नामध्ये बाहेरील पाहुण्यांची तसेच गावातील नागरिकांची एकत्रित गर्दी होते. ही संधी साधून एकदाही गावाची भेट न घेणारे उमेदवार हे अशा कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत असून, यामधूनही आपला प्रचार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.ग्रामीण भागात पक्षाचे कार्यकर्तेही मतदारांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली असून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करीत आहे. सध्या प्रचाराची भोंगे वा जायला सुरुवात व्हायची असून या दोन दिवसात ते सुरू होईल आणि गावागावात रोड शो, सभांच्या माध्यमातून सर्वच पक्षाचा प्रचार सुरू होणार आहे. सध्यातरी मतदारांचा कल कोणाकडे हे पूर्णपणे निश्चित झाले नसले तरी ग्रामीण भागात निवडणुकीच्या चर्चांना वेग येत असल्याचे दिसून येत आहे.

# मूल येथे हत्तीरोग निर्मूलन अभियान अंतर्गत औषधी वाटप

**मूल । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कृषि महाविद्यालय,मूल येथे दिनांक २८ मार्च २०२४ रोजी हत्तीरोग निर्मूलन व त्यावरील उपायाचे आयोजन करण्यात आले होते.राज्यातील पाच जिल्ह्यांना हत्तीरोंगाची लागण होण्याची शक्यता असल्याने,त्या जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत नागरिकांना घरोघरी तसेच विद्यार्थ्यांना शाळा आणि महाविद्यालयात जाऊन प्रतिबंधात्मक औषधीचे वाटप करण्यात येत आहे. ही मोहिमभंडारा,चंद्रपूर, गडचिरोली,गोंदिया आणि नांदेड या पाच जिल्ह्यांत राबविली जाणार आहे. याचाच एक भाग म्हणून कृषी महाविद्यालय मूल येथे प्रतिबंधात्मक औषधीचे वाटप करण्यात आले.




हत्तीरोग निर्मूलन व त्यावरील उपाय कृषि महाविद्यालय, मूलचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विष्णुकांत टेकाळे यांच्या उपस्थितीत घेण्यात आला.हत्तीरोग निर्मूलन व त्यावरील उपायाचे आयोजन करण्याचा उद्देश म्हणजे लोकांना हत्तीरोगाची लागन होऊ नये व लोकांमध्ये हत्तीरोगांबद्धल गैरसमज निर्माण होऊ नये हा होय.डॉ.लाडे वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुणालय मूल व त्यांची चमु यांच्या सहकार्याने हत्तीरोगांविषयी जागरूकता निर्माण करणयाकरिता आणि कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सक्रिय योगदान दिले. या शिबीरा प्रसंगी महाविद्यालयातील रासेयो चे स्वयंसेवकआणि प्राध्यापक यांनी उत्सफूर्तपणे प्रतिसाद दिला.

# चिंधीचक येथे श्री एकनाथी भागवत ज्ञान व सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**तळोधी( बा) । प्रतिनिधी**

श्री संत एकनाथ महाराज ४२४ षष्ठी पित्यर्थ श्री संत तुकाराम महाराज बीज व श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती श्री एकनाथी भागवत ज्ञान यज्ञ व सामूहिक विवाह सोहळा दिनांक २८ मार्च गुरुवार ते ३१ मार्च रविवार पर्यंत श्री ब्रह्म मूर्ती शिषानंद बाबा सेवाश्रम शिवमंदिर डोंगरी चिंधी चक च्या वतीने तालुका नागभीड येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

कार्यक्रमात घटस्थापना सामुदायिक प्रार्थना व चिंतन, श्रीहरी पाठ, श्री एकनाथी भागवत प्रवचन ,सहस्त्र नाम जप, भूपाळी ,श्री ग्रामगीता प्रवचन, गोवर्धन पूजा दिंडी सोहळा महिला संमेलन , हळदी कुंकू, ब्रम्हांडनायक गोपाल कृष्ण, निजधाम गमन काला, कीर्तन दहीहंडी श्री भागवत ग्रंथ महापूजा, सामूहिक विवाह सोहळा,आरती, प्रसाद व महाप्रसाद उपरोक्त कार्यक्रमाच्या भाविकांनी लाभ घ्यावा . या कार्यक्रमात श्री एकनाथी भागवत प्रवचनकार श्री ओमप्रकाश पांडे महाराज भद्रावती यांच्या गोड वाणीतून आपल्याला भागवत ऐकायला मिळणार आहे.दिनांक ३१ मार्च रोज रविवारला दुपारी साडेबारा वाजता अभिजीत मुहूर्तावर सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे यात तीन वधू वर जोडपे यांचे विवाह होणार आहे तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाच्या लाभ घ्यावा असे आवाहन आदिनाथ गुरुमाऊली सेवा मंडळ समस्त ग्रामवासी जनता जनार्दन चक यांनी केले आहे.



**सध्या उन्हाळ्याची हळू हळू तीव्रता वाढत असुन गरीबाची फ्रिज समजले जाणारे मातीचे माठ थंड पाण्यासाठी बाजारात उपलब्ध झाले आहेत. छाया :प्रणय बांगरे.**

# आमदार किशोर जोरगेवार यांनी घेतले श्री चैतन्य कानिफनाथ महाराज पालखीचे दर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

श्री चैतन्य कानिफनाथ महाराज सरोदी समाज संघटना चंद्रपुर, च्या वतीने इंदीरानगर येथे श्री कानिफनाथ जन्मोत्सव (पंचमी) यात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार पालखीचे दर्शन घेत पालखीत सहभागी झाले.

यावेळी श्री चैतन्य कणिकनाथ महाराज सरोदी समाज संघटणेचे भास्कर भोयर, कैलाश गदाई, पाडुरंग भगाडे, शुभाष साकुरे, कुंजीलाल मोरे, अनिता गदाई, संगीता भगाडे, जमाना भोयर आदींची उपस्थिती होती.




दरवर्षी प्रमाणे यंदा ही श्री चैतन्य कानिफनाथ महाराज सरोदी समाज संघटना चंद्रपुर, च्या वतीने इंदीरानगर येथे श्री कानिफनाथ जन्मोत्सव (पंचमी) यात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इंदिरा नगर येथून पालखी काढण्यात आली. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी श्री चैतन्य कानिफनाथ महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन वंदन केले. यावेळी निघालेल्या पालखीत आमदार किशोर जोरगेवार हे ही सहभागी झाले होते. यावेळी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# हा तर फक्त ट्रेलर, पिक्चर अभी बाकी है..:अनेक आमदार शरद पवार यांच्या संपर्कात–रोहित पवार

**बारामती**–हा तर फक्त ट्रेलर आहे. पिक्चर अभी बाकी है. अनेक आमदार शरद पवार यांच्या संपर्कात आहेत असे मोठे विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे. तसेच नीलेश लंके आता आपले नगरचे उमेदवार असणार आहेत, काल त्यांनी राजीनामा दिला. त्यांचे मन तिकडे रमत नव्हते असेही ते म्हणाले. बारामती लोकसभा मतदारसंघात रोहित पवार यांचा प्रचार दौरा सुरू आहे. यावेळी स्थानिकांना संबोधित करत असताना रोहित पवार यांनी हे विधान केले आहे.यावेळी रोहित पवार म्हणाले, ''नीलेश लंके आता आपले नगरचे उमेदवार असणार आहेत, काल त्यांनी राजीनामा दिला. त्यांचे मन तिकडं जमत नव्हते. ते लोकांशी बोलले आणि त्यांनी मत बनवले. लोक शरद पवार यांच्यासोबत आहेत. हा तर फक्त ट्रेलर आहे. पिक्चर अभी बाकी है अनेक आमदार आमच्या आणि शरद पवार यांच्या संपर्कात आहेत. अनेकजण परत येण्यासाठी इच्छुक आहेत'', असा दावा रोहित पवारांनी केला.पुढे बोलतांना त्यांनी बारामतीकरांना साद घातली आहे. आम्हाला इथल्या सामान्य लोकांचे प्रश्न सोडवायचे आहेत. अनेक प्रश्न सुप्रिया सुळे यांच्या हातात आहेत. ते देखील सोडवण्यासाठी सुप्रिया सुळे यांनी प्रयत्न केला आहे. या मतदार संघात राज्यभरातून लोक येतात. ही निवडणूक फार महत्त्वाची आहे. बारामती लोकसभा मतदारसंघावर संपूर्ण देशाचे लक्ष आहे'', असे रोहित पवार म्हणाले. तसेच भाजपकडून आपल्या विचारांवर घाव घालण्याचा प्रयत्न होत आहे. बारामती ही फक्त पवारसाहेबांचीच आहे हे आपल्याला दाखवून द्यायचे आहे. भाजपला बारामतीत २०१४ मध्ये यश आले नाही. म्हणून आता त्यांनी खूप मोठी ताकद लावली आहे. पुरोगामी विरूद्ध प्रतिगामी अशी ही लढाई आहे. सुप्रिया सुळे किती मतांनी निवडणून येतात, याकडे सर्वांचे लक्ष आहे. त्यामुळे आपण सगळ्यांनी कामाला लागले पाहिजे, असे रोहित पवार म्हणाले.याशिवाय रोहित पवार यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ''प्रशासनाकडून आपल्यावर मोठा दबाव टाकला जात आहे. अनेक ठिकाणी गुंडाचा वापर केला जात आहे. ते काहीही करू शकतात. ते बूथ देखील ताब्यात घेतील. त्यांनी पगारी लोक ठेवले आहेत. बारामतीत विजय आपलाच आहे. अखख्या महाराष्ट्रात आपल्यासाठी सकारात्मक वातावरण आहे. त्यामुळे भाजप आता घाबरला आहे'', असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .